ISSN 2394-5303

2017-18

GOLDEN JUBILEE YEAR
1967-2017

१९६६-२०१६
सुवर्ण महोत्सवी वर्ष

Printing Area
UGC
Jr. No. 43053

25/2017

श्री बालाजी संस्थान, देऊळगाव राजा द्वारा संचालित

## श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

देऊळगाव राजा, जि.बुलढाणा (महा.) पिन-४४३२०४

नॅक पुनर्मूल्यांकन 'ब++' दर्जा प्राप्त

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया ™


विशेषांक, डिसेंबर-२०१७

# भारतीय कृषिक्षेत्रासमोरील आव्हाने व संधी

IMPACT FACTOR 4.002

330

संपादक
प्रा.ज्ञानेश्वर विष्णू गोरे



Scanned with CamScanner

14)The Need of Kisan Credit Card in India for "Agricultural Finance ...
Yogesh K. Athave, Dist. Buldana (MS) || 49

15)प्रधानमंत्री कृषि सिचाई योजना
प्रा.डॉ. निता नन्दलाल तिवारी, अकोला || 51

16)भारतीय कृषि में पूंजी निर्माण (Capital Formation in Indian Agriculture)
Dr. Ganesh B. Darade & Mr. Ananta J. Pawar, Dist. Buldana (MS). || 55

17)शेतकर्यांच्या आत्महत्या आणि शासकीय पॅकेज वरवरची मलमपट्टी
प्रा. डॉ. संतोष तु. कुटे जि. बुलढाणा. || 57

18)मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्या : एक अभ्यास
प्रा. डॉ. ए. बी. वायकर जि.जालना || 61

19)डॉ. स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशीचा मागोवा
डॉ. करमसिंग राजपूत,जि.यवतमाळ. || 64

20)भारतीय शेती क्षेत्रासमोरील आव्हान : शेतकर्यांच्या आत्महत्या
प्रा. शिवाजी काकडे, जि. बीड || 67

21)शेतीच्या विकसात ठिबक सिंचन पध्दतीचे योगदान एक अभ्यास
डॉ.दयाळू किसन राठोड जि. अकोला. || 70

22)भारतीय शेती स्वरूप आणि आव्हाने
प्रा. डॉ. ि. जे. एस. सवाईथूल महा. अम. || 74

23)शेतकऱ्यांच्या आत्महत्या — एक विश्लेषण
प्रा. डॉ. किशन सत्ताजी बाभुळगावकर वसमत || 77

24)भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीविपननाचे महत्व
डॉ. केशव सुर्यभान गुल्हाने,जि. बुलढाणा || 80

25)भारतीय अर्थव्यवस्थेत साखर उद्योगाची भूमिका
डॉ. दिलीप का. खुपसे, जि. यवतमाळ || 83

26)शेतकरी आत्महत्या व ग्लोबल वार्मिंग
डॉ. एस.टी.वराडे, खामगांव || 85

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



Scanned with CamScanner

उचित होगा। उर्वरकों, ग्रामीण बिजली, सिंचाई, उधार और अन्य कृषि आगतों को दी जा रही सब्सिडी को घटकार उत्पादक परिसम्पत्तियों के सृजन में प्राप्त अधिशेष को लगाया जाना चाहिए। इसके अतिरिक्त, कृषि में पूंजी निर्माण को बढ़ाने की रणनीति में आधारभूत ढांचे के विकास के लिए आयोजना व्यय के अनुपात को बढ़ाना, उतपदकता बढ़ाने के लिए संसाधनों का अधिक कुशल प्रयोग तथा कृषकों को अधिक निवेश के लिए अपनी बचतों का उपयोग करने में सक्षम बनाने हेतु उन्हें उपज का लाभकारी मूल्य दिलाया जाना शामिल किया जाना चाहिए। मध्यम एवं लघु सिंचाई योजनाओं एवं मृदा संरक्षण परियोजनाओं को समय पर पूरा करने हेतु ऋण प्रदान करने में राष्ट्रीय कृषि एवं ग्रामिण विकास बैंक (नाबार्ड) को कारगर भूमिका निभानी होगी। कृषि में निजी निवेश को प्रोत्साहित किया जाना भी समोचीत होगा।

**संदर्भ :**


(१) Arunachalam R. Agriculture Growth and Economic Reforms Deep & Deep Publication, New Delhi.

(२) डॉ.बसुधा पुरोहित भारतीय अर्थव्यवस्था राजमुद्रा ऑफसेट चिकलठाणा, औरंगाबाद.

(३) डॉ.विजय कविमंडन, कृषी अर्थशास्त्र श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

(४) प्रतियोगिता साहित्य, साहित्य भवन पब्लिकेशन, आग्रा.


❑❑❑

**17**

# शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि शासकीय पॅकेज वरवरची मलमपट्टी


**प्रा. डॉ. संतोष तु. कुटे**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

कला व विज्ञान महिला महाविद्यालय,

मेहकर, ता. मेहकर, जि. बुलडाणा.


**********

**प्रस्तावना**

आज आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ६८ वर्ष झाली. पण शेतकऱ्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्षच झाल्याच दिसून आल्याने देशात जवळ जवळ पाच वर्षात असंख्य बळीराजांच्या आत्महत्या झाल्या आहेत. आज हरितक्रांतीमुळे उत्पादन वाढले परंतु उत्पादित मालाचा झालेला खर्चही फिटू शकत नसल्याने आज ५०% पेक्षाही अधिक शेतकरी कर्जबाजारी आहेत. त्यांना सावकारांकडून कर्ज घेतल्याशिवाय पर्याय उरलेला नाही.

भारतात बँक व्यवसायाचे दोन भाग आपण करतो. एक परंपरागत व असंघटित बँक व्यवसाय आणि दुसरा संघटित बँक व्यवसाय. परंपरागत बँक व्यवसाय क्षेत्र ऐतद्देशीय बँका आणि सावकार यांचे बनले आहे. संघटित बँक व्यवसाय क्षेत्रात आधुनिक व्यापारी बँका, परकीय बँका, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया इ. चा समावेश होतो. असंघटित क्षेत्रात सावकारोचे प्राबल्य मोठ्या प्रमाणात आजही दिसून येते. बँकाकडे कर्ज मागतांना शेतकऱ्यांचीहोणारी हेळसांड लक्षात शेतकरी बँकाकडून कर्ज न घेता खाजगी सावकाराकडून कर्ज घेतात. आणि सावकाराच्या व व्याजाच्या विळख्यात सापडून आत्महत्येसारखे कार्य करतात. म्हणून शेतकरी आत्महत्या हा एक गंभीर आणि गहन विषय बनला आहे. सदर शोधनिबंधात महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या आणि शासनामार्फत जाहिर पॅकेज यांचा यांचा सहसंबंध अभ्यासला आहे. आणि हे पॅकेज प्रभावी न ठरता कशाप्रकारे वरवरचे प्रयोग झाले याचे विवेचन केले आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

१. शेतकरी आत्महत्येचे भारत आणि महाराष्ट्रासंदर्भात गांभिर्य अभ्यासणे.

330 Smt. Sindhutai Jadhav Maha Mehkar

२. शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी शासनाने उचलेल्या पावलांची समिक्षा करणे.

३. शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी जनसामान्यांना अपेक्षित उपाय सुचविणे.

**संशोधन पध्दती**

शेतकरी आत्महत्यांचे गांभिर्य अभ्यासण्यासाठी तसेच शासकीय पातळीवरुन शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी उचलण्यात आलेल्या पावलांची समिक्षा करण्यासाठी द्वितीय साधनसामुग्रीचा अवलंब करण्यात आला आहे. त्यामध्ये विविध प्रकारचे सांख्यिकीय अहवाल, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, मासिके, वर्तमानपत्रातील विविध लेख इत्यादीचा अवलंब करण्यात आला आहे.

**महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या**

भारतीय अर्थव्यवस्थेचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजेच कृषीप्रधानता आहे. परंतु या कृषीप्रधानतेमुळे शेतकऱ्यांची अर्थव्यवस्था अतिशय दयनीय किंबहुना त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. शेतकऱ्यांना आपल्या शेतीतील उत्पन्नातून उदरनिर्वाहाचा खर्च भागविणे देखील कठीण झाले आहे. त्यांना आपल्या लहान-लहान गरजांसाठी देखील कर्ज काढावे लागत आहे. त्यातच मुलांचे शिक्षण, मुलीचे लग्न, घर बांधकाम इ. कामे निघाले तर त्यांचे प्रचंड हाल होतात. एकुणच भारतीय शेतकरी दारिद्र्य व कर्जबाजारीपणाच्या चक्रव्युहात अडकलेला आहे, त्यामुळे त्यांची समजातील प्रतिष्ठादेखील खालावली आहे. या सर्वांच्या परिणामामुळे शेतकरी जीवनाला वैतागून आत्महत्येचा मार्ग अवलंबत आहेत. त्यामुळे भारतात आज शेतकऱ्यांच्या आत्महत्या या समस्येने गंभीर रुप धारण केले आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही समस्या भारतात प्रामुख्याने १९९० नंतर तीव्र स्वरुपात जाणवू लागली. भारतात १९९५ पर्यंत शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची स्वतंत्र नोंद वर्तमानपत्राशिवाय इतर कोठेही नव्हती. १९९७ पासून नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरोच्या अहवालात भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची स्वतंत्र नोंद घेण्यास सुरुवात झाली. तेव्हापासन म्हणजेच १९९७ पासून २०१२ पर्यंत भारतात २,६०,२४५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यांचे वार्षिक प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

भारतात सर्वात अधिक शेतकरी आत्महत्या या महाराष्ट्रात झाल्या आहेत. त्यातल्या त्यात महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या विदर्भ आणि मराठवाड्यात मोठ्या प्रमाणावर होत आहेत. प्रामुख्याने कोरडवाहू कापूस उत्पादक पट्यात हे प्रमाण जास्त आहे. परंतु आता सधन अशा पश्चिम महाराष्ट्रातसुध्दा शेतकरी आत्महत्या करु लागले आहेत तर कोकणात सुध्दा आत्महत्यांचे प्रकार घडले आहेत. १९९७ ते २०१२ या कालावधीत ५४,५४० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.

तक्ता क्र.१: भारत आणि महाराष्ट्रातील वर्षनिहाय शेतकऱ्यांची संख्या

| अ.क्र. | वर्ष | भारतातील शेतकरी आत्महत्या | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या | भारतातील शेतकरी आत्महत्येशी महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्येचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | २००५ | १७१३१ | ३९२६ | २२.९२ |
| २ | २००६ | १७०६० | ४४५३ | २६.१० |
| ३ | २००७ | १६६३२ | ४२३८ | २५.४८ |
| ४ | २००८ | १६१९६ | ३८०२ | २३.४७ |
| ५ | २००९ | १७३६८ | २८७२ | १६.५४ |
| ६ | २०१० | १५,९६४ | ३१४१ | १९.६८ |
| ७ | २०११ | १४०२७ | ३३३७ | २३.७९ |
| ८ | २०१२ | १३७५४ | ३७८६ | २७.५३ |

**स्त्रोत : http:/ncrb.gov.in**

उपरोक्त तक्त्यावरुन महाराष्ट्रातील आत्महत्येचे वास्तव स्वरुप लक्षात येते. तसेच महाराष्ट्रात एवढ्या मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. सन २००५ पासून महाराष्ट्रात साधारणतः ३००० पेक्षा जास्त आत्महत्या झाल्या आहेत. सन २०१२ मध्ये तर आत्महत्येचे भारतातील शेतकरी आत्महत्येशी असणारे प्रमाण वाढत जाऊन २७.५३ टक्के झालेले दिसून येते. म्हणजेच आजही शेतकरी आत्महत्या मोठ्याप्रमाणावर आत्महत्या करित आहेत.

आत्महत्या थांबविण्यासाठी झालेले शासकीय प्रयत्न

शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी शासनाकडून आतापर्यंत करण्यात आलेल्या प्रयत्नांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे

**महाराष्ट्र शासनाने पॅकेज:**

महाराष्ट्र शासनाचे मुख्यमंत्री यांनी २००५ च्या हिवाळी अधिवेशनात १०७५ कोटी रुपयाचे पॅकेज जाहीर केले. यामध्ये

१. कापूस उत्पादकांना प्रतिहेक्टरी १०,००० रु मदत म्हणून देण्यात आले.

२. पाणलोट क्षेत्राला भरीव मदत.

३. सामुहिक विवाह सोहळ्यासाठी म...

330



UGC Approved Sr.No.43053

Scanned with CamScanner

४. पीक विमा योजनेच्या हप्त्यात सवलत

५. कृषी उद्योगाला चालना देण्यासाठी आर्थिक मदत

६. शेतकऱ्यांच्या शेती व कौटुंबिक खर्चासाठी क्रेडिट कार्ड योजना

७. सावकारी कर्जाचेनियमन करण्यावर भर

८. शेतकऱ्यांना २५,०० रुपयापर्यंत पीक कर्जाची पुनर्रचना.

उपरोक्त उद्देशाने विदर्भातील आत्महतया यवतमाळ, अमरावती, अकोला, वर्धा, वाशिम आणि बुलडाणा या जिल्ह्यात हा पायलट प्रकल्प म्हणून राबवण्यात आला. एकंदरित विदर्भातील शेतकऱ्यांचे प्रश्न लक्षात घेता त्यादृष्टीने राज्य सरकारने पॅकेजद्वारा केलेला उपचार निरपयोगी ठरला. ती केवळ वरवरची मलमपट्टी ठरली. तसचे या पॅकेजमध्ये दीर्घकालीन उपायांचा कोणताही उल्लेख आढळला नाही.

**केंद्राचे पॅकेज**

प्रसार माध्यमांनी लक्ष वेधल्यानंतर व विविध सेवाभावी संस्था, संघटना व राजकीय पक्षांनी विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर लक्ष वेधल्यानंतर नागपूर दौऱ्यात पंतप्रधानांनी १ जुलै २००७ रोजी विदर्भातील वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम आणि बुलडाणा या सहा जिल्ह्यांसाठी मिळाले.

**तक्ता क्र. पॅकेजमधील कार्यक्रमनिहाय तरतूद**

| अ.क्र. | कार्यक्रम | रक्कम (कोटी रु.) |
|---|---|---|
| १ | व्याजमाफी | ७१२ |
| २ | अपुरे सिंचन प्रकल्प | २१७७ |
| ३ | सूक्ष्मसिंचन | ७८ |
| ४ | पाणलोट क्षेत्र, जलसंवर्धन | २४० |
| ५ | बी-बियाणे वाटप | १८० |
| ६ | राष्ट्रीय फलोद्यान कार्यक्रम | २२५ |
| ७ | पर्यायी उत्पन्न प्राप्ती कार्यक्रम (शेती पूरक व्यवसाय) | १३५ |
| ८ | तातडीच्या संकटासाठी (प्रत्येक जिल्हास ५० लाख रु.) | ०३ |
| | एकूण | ३७५० |

(स्त्रोत:डॉ. जहागिरदार आणि धिरज कदम., शेतकऱ्यांच्या आत्महत्या, संदर्भ यवतमाळ जिल्ह्याचा पृष्ठ क्र.८८)

विदर्भातील शेतकऱ्यांची दयनीय अवस्था पाहता त्यांना तातडीच्या उपायाची गरज होती. परंतु पंतप्रधानाच्या पॅकेजमध्ये जलसिंचनावर सर्वाधिक भर देण्यात आला. आर्थिक तरतूद ही शेतकऱ्यांच्या आत्महत्याबाबत दीर्घकालीन उपाययोजना होती. त्यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांच्या वास्तव गरजा पूर्ण करण्यास हे पॅकेज कमी पडले त्यामुळे आत्महत्या काही थांबल्या नाहीत.

**शेतकऱ्यांची कर्जमाफी**

केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी २००८ च्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांच्या कर्जमाफी व व्याज सवलती आणि ६१ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते या सुधारित योजनेत निवडक २३७ जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा समावेश होता. मोठ्या शेतकऱ्यांना त्यांच्या कर्जाच्या २५ टक्के किंवा जास्तीत जास्त २० हजार रुपये कर्जमाफी दिली जाईल. कुक्कुटपालन, पशुपालन, मासेमारी, दुग्धव्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांचाही या योजनेत समावेश करण्यातत आला. याशिवाय शेळी, मेंढी, मधमाशा पाळणे तसेच रोपवाटीका, बायोगॅस, विहीर खोदणे, जुन्या विहिरींची दुरुस्ती, ट्रॅक्टर, बैल व मोटारपंप खरेदी यासाठी घेतलेल्या कर्जासाठी ही योजना लागू राहील. या योजनेअंतर्गत अल्पभूधारक आणि छोटया शेतकऱ्यांचे कर्ज पूर्णपणे माफ करण्यात येईल. ते सर्व जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे माफ होईल. या कर्जमाफी योजनेतून छोटया, मोठ्या मध्यम चार कोटी शेतकऱ्यांना लाभ मिळाला.

या योजनेद्वारे ७१६८० कोटी रुपये एवढा बोजा सरकारी पडणारा आहे. या खेरीज ६० ते ६५ टक्के मोठ्या शेतकऱ्यांना कर्जमाफीच्या कक्षात आणण्यात आले.

**कर्जमाफीची वैशिष्ट्ये**

१. एक हेक्टर जमीनधारक शेतकरी छोटे तर एक ते दोन हेक्टरपर्यंत शेतकऱ्यांना मध्यम शेतकरी समजले जाईल.

२. अल्पभूधारक व छोट्या शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी दिली जाईल.

३. दोन हेक्टरपेक्षा जास्त जमीन असलेल्या शेतकऱ्यांना एकरकमी कर्जफेडीवर २५ टक्के सूट मिळले. त्यांनी या कर्जाचे हप्ते ३० जून २००९ पर्यंत फेड केले तरी चालेल. शिल्लक कर्जावर कोणतेही व्याज लागणार नाही.

४. दुष्काळग्रस्त २३७ जिल्ह्यील शेतकऱ्यांना थकीत कर्जाच्या २५ टक्के अथवा २० हजार यापैकी जास्त असलेली रक्कम माफ केली जाईल.

५. शेती बरोबर कुक्कुटपालन व इतर जोडधंद्यांना कर्ज माफी.

अशाप्रकारे केंद्र सरकारने शेतकऱ्यांचे कर्ज माफ करुन शेत जमिनीवरील बोजा कमी करण्याचे आदेश [illegible]



Scanned with CamScanner

दिले. महाराष्ट्र शासन व केंद्राने पॅकेज व कर्जमाफी योजना या प्रभावी ठरल्या नाहीत. त्यानंतरही शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या नाहीत. स्वातंत्र्यापासून शेती क्षेत्रात नियोजन व निश्चित धोरण नसल्यामुळे, शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव, जलसिंचनाची प्रभावी योजना, माफक दरात कर्जपुरवठा व विमा संरक्षण या बाबीवर लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे. त्याचा पॅकेजमध्ये अंतर्भाव नव्हता. कर्जमाफीने हा प्रश्न सुटणार नाही. कारण, कर्जमाफीचा सर्वाधिक फायदा ज्या विभागात शेतकऱ्यांच्या कर्जामुळे आत्महत्या झाल्या नाहीत त्या भागात झाला.

### शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी शिफारशी

शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी शासनदरबारी झालेल्या प्रयत्नांची तोटकता लक्षात घेता. जनसामान्यांना कळू शकतील आणि शेतकऱ्यांना प्रत्यक्ष दिलासा देतील अशा उपाययोजना करणे काळाची गरज आहे. त्यासाठी सदर शोधनिबंधातून पुढील शिफारशी करण्यात आल्या आहेत.

१. शासकीय मदतीच्या निकषांची व्याप्ती वाढवावी.

२. आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबांना आर्थिक मदत करावी.

३. आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबाचा सातबारा कोरा करावा.

४. आत्महत्याकलेल्या शेतकरी कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाचा खर्च शासनाने करावा.

५. आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील एका व्यक्तीस त्याच्या पात्रतेनुसार शासकीय नोकरीत समाविष्ट करून घ्यावे.

६. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या पत्नीस किंवा घरातील वृध्दानां किमान २००० रुपये मासिक पेन्शन द्यावी.

७. आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबासाठी विशेष शासकीय योजना राबवाव्यात.

८. शेतकऱ्यांना राष्ट्रीयकृत बँकाद्वारे अतिशय अल्प व्याजदरावर कर्ज मिळेल अशा व्यवस्था करावी.

९. बहुतांश आत्महत्याकेलेले शेतकरी हे कोरडवाहू शेती करणारे असल्यामुळे शासनाने शेततळी, बंधारे, पाझर तलाव, मोठ्यातलावाची संख्या वाढवून सिंचनाच्या सुविधा निर्माण कराव्यात. आत्महत्येचे मुळ दारिद्रय मुक्ती आणि कर्जमुक्तीत असल्याने शासनाने शेतकऱ्यांच्या दारिद्रयमुक्ती आणि कर्जमुक्तीसाठी प्रयत्न करावे.

वरील उपाय अवलंबिल्यास शासनावरील शेतकऱ्यांचा विश्वास वाढेल आणि ते आत्महत्या न करता सकारात्मक दृष्टीकोनातून विचार करु लागतील.

### संदर्भ

१. धांदेवाले श्रीनिवास (२००५), विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी अर्थिक परिवर्तन, संपादित ग्रंथ.

२. सुरासे मालेद (२००६)., शेतकऱ्यांच्या आत्महत्या : चिंता आणि चिंतन., सधीर प्रकाशन, कळंब.

३. लांजेवार नरेंद्र (२००८)., शेतकऱ्यांच्या आत्महत्या :चिंतन आणि उपाय., सुगंध प्रकाशन, डोंबिवली

४. गव्हाणे सतीश (२०१२), कृषी क्षेत्रातील पेचप्रसंग आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

५. मनोहर दिनानाथ (२०००)., नवे शेतीतंत्र आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या, श्रमधन प्रकाशन, बारामती.

□□□

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana



Scanned with CamScanner